International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.4 March – April 2024

# नाशिक जिल्ह्यातील स्थलांतरित असंघटित कामगारांच्या समस्यांचा समाजशास्त्रीय अभ्यास

**डॉ. शशिकांत भाऊसाहेब माळोदे**
*सहाय्यक प्राध्यापक,*
*के. टी. एच. एम. कॉलेज, नाशिक*
*Corresponding Author - डॉ. शशिकांत भाऊसाहेब माळोदे*
**DOI - 10.5281/zenodo.10939509**

**प्रस्तावना:**

कोणत्याही देशाची प्रगती आणि विकासामध्ये त्या देशातील कामगार वर्गाचा निर्णायक सहभाग असतो. कोणत्याही आर्थिक घडामोडींमध्ये हे मनुष्यबळ महत्त्वाची भूमिका निभावत असते. भारतातील कामगार वर्ग संघटित आणि असंघटित असे दोन क्षेत्रांमध्ये विभागला गेला आहे. संघटित क्षेत्रातील कामगार कायदे आणि नियमांच्या बळावर आपल्या हक्कासाठी लढवू शकतात. त्यांना काही प्रमाणात का होईना आपल्या हक्कांची जाणीव आहे. परंतु अशा भाग्यवान कामगारांमध्ये भारतातील खूपच कमी कामगारांचा समावेश होतो. देशातील बहुतांश कामगार असंघटित वर्गात मोडतात. कोणत्याही प्रकारची नोकरीची हमी किंवा सामाजिक सुरक्षा उपलब्ध नाही. आपल्यावरील अन्यायाला प्रतिकार करू शकत नाहीत. देशातील सर्वच प्रकारच्या कामगारांच्या काही विशिष्ट समस्या आहेत. मग ते संघटित क्षेत्रातील असो की असंघटित, औद्योगिक असो की, शेतमजूर किंवा स्थलांतरित असो का स्थानिक.

"असंघटित" हा शब्दच मजुरांची स्थिति दर्शविणारा आहे. अत्यल्प मजुरी, विपरीत परिस्थितीत काम आणि रोजगार याबाबतची अनिश्चीततता अशा दुष्टचक्रातून हे मजूर जात असतात. अनेकांना आपल्या कुटुंबकबिल्यासह कामाच्या शोधात गाव सोडावे लागते. बांधकाम मजूर, रस्ते बांधण्याचे काम करणारे कामगार आणि घरकाम करणारे अशा अनेक स्वरूपात हे स्थलांतरित कामगार आपल्या आसपास आढळून येतात. महिला कामगारांची संख्याही प्रचंड मोठी आहे. परंतु त्यांच्या कामाची तितकीशी दखल घेतली जात नाही.

२०२५ साली भारत सर्वात कार्यक्षम मनुष्यबळ असणारा देश बनणार आहे. त्यामुळे कामगार विषयक मुद्द्यांकडे दुर्लक्ष करणे चुकीचे ठरेल. त्यामुळेच कामगारांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी 'औद्योगिक तंटे कायदा', 'किमान

वेतन कायदा' आणि 'कंत्राटी कामगार कायदा' यासारखे अनेक कायदे मागील काही काळात करण्यात आले आहेत. यामध्ये अगदी अलीकडेच करण्यात आलेल्या 'बोनस सुधारणा कायदा-२०१५,' 'कर्मचारी नुकसान भरपाई कायदा-२०१६', 'बालमजुरी प्रतिबंध आणि नियमन सुधारणा कायदा-२०१६' आदींचा समावेश आहे. केंद्रीय कामगार आणि रोजगार खाते आता केंद्रीय कामगार कायद्यांचे सुलभीकरण सुसूत्रीकरण आणि एकत्रीकरण करण्यासाठी पावले उचलत आहे. 'महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना', 'अटल पेन्शन योजना', 'प्रधानमंत्री कौशल विकास योजना', 'मुद्रा योजना' , 'प्रधानमंत्री रोजगार प्रोत्साहन योजना' अशा अनेक योजना सुरू करण्यात आल्या असून त्याद्वारे विद्यमान आणि भावी कामगारांचे कल्याण आणि हित जोपासण्याचा प्रयत्न सरकार करीत आहे.

**संदर्भ साहित्य आढावा:**

**झकेरिया के.सी . :(१९६०)**

डॉ. झकेरिया यांनी १९०१ - १९३१ या काळातील प्रत्येक दशकासाठी स्थलांतराचा अंदाज काढून असा निष्कर्ष काढला आहे की, या तीन दशकांमध्ये संयुक्त प्रांत बिहार, ओरिसा, राजपुताना, मद्रास, पंजाब, जम्मू-काश्मीर या प्रांताचा लोकसंख्येत निव्वळ स्थलांतरामुळे घट झाली. तर आसाम, बंगाल, मुंबई, त्रावणकोर, कोचीन, म्हैसूर या प्रांतांमध्ये स्थलांतरामुळे भर पडली. झकेरिया यांच्या अंदाजाप्रमाणे १९४१ ते १९५१ या दशकात ग्रामीण भागातून शहराकडे होणारे स्थलांतर हे जवळजवळ ८.२ दशलक्ष होते. म्हणजे १९४१ च्या नागरी लोकसंख्येचा १८ टक्के तर ग्रामीण लोकसंख्येचा ३ टक्के होते.

**वैद्यनाथन आणि गिरधर (१९६१):**

वैद्यनाथन आणि गिरधर यांचा पाहणीनुसार १९५१ ते १९६१ या काळात आर्थिक संधी स्थलांतर झाले आहेत. स्थलांतर हे लोकसंख्याशास्त्र विषयक, सामाजिक, सांस्कृतिक व संख्यात्मक घटकांशिवाय मजुरीतील फरक व संधीतील फरक यावर स्थलांतर अवलंबून असते. आर्थिक व सामाजिक कारणांमुळे स्थलांतर घडत असते. भारतामध्ये स्थलांतर हे बेरोजगारी, कमी उत्पन्न व जमिनीची उपलब्धता यामुळे घडते. अनेक अभ्यासात असे दर्शवतात की, ग्रामीण भागातील कुटुंबाचा दर्जा जमिनीचा मालकी हक्क उपलब्धतेवर ठरविला जातो की, जो जीवन जगण्याचा प्रमुख मार्ग आहे. त्यामुळे मोठे जमीनदार हे लहान शेतकरी व अल्पसंख्यांक यांच्या कडून जमीन खरेदी करतात. पर्यायही शेतकरी आपल्या उदरनिर्वाहासाठी शहराकडे स्थलांतर करतात.

काही अभ्यासकांच्या निदर्शनास आले आहे की, अनेक स्थलांतरी हे काही कालावधीनंतर आपल्या मूळ ठिकाणी परत जातात. काही स्थलांतरी जोपर्यंत काम मिळते किंवा रोजगार उपलब्ध असतो. तोपर्यंतच स्थलांतर करतात आणि रोजगार संपल्यानंतर पुन्हा गावी परत जातात.

**भारतीय जनगणना (१९६१):**

१९६१ च्या भारतीय जणगनेमध्ये जीवनावधी स्थलांतराचा वास्तव्य काळ दिलेला आहे. त्यातील १० वर्षापेक्षा कमी वास्तव्य असलेले स्थलांतरी १९६१-६१ या दशकातील स्थलांतरी आहेत. असे स्थूलमानाने समजून राज्याराज्यातील प्रवाह पाहिले, तर असे दिसून येते की पश्चिम बंगाल, महाराष्ट्र या राज्यांमध्ये फार मोठ्या प्रमाणात लोकसंख्या स्थलांतरित झाली आहे. उदाहरणार्थ पश्चिम बंगाल ३.२ दशलक्ष, महाराष्ट्र १.६ दशलक्ष, या उलट उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान या राज्यांमधून स्थलांतरामुळे मोठ्या प्रमाणात लोकसंख्या बाहेर गेली. उत्तर प्रदेश १.६ दशलक्ष, बिहार १.१ दशलक्ष, राजस्थान ६ लाख एवढे स्थलांतर झाले.

**डॉनॉल्ड जे बुग :(१९६४)**

यांनी स्थलांतर याविषयी एक परीकल्पना मांडली त्यांच्या परीकल्पनेनुसार त्यांनी खालील संशोधन केले. १ (कोणत्याही स्थलांतर घटकांमध्ये विकासाच्या टप्प्यात एक क्रम असतात (२ . आर्थिक विकास तंत्रज्ञानातील वाढ अधिक शिक्षित लोकांना स्थलांतर होण्याची प्रेरणा देतात. तसेच विभागातील गतिरोधामुळे झालेल्या स्थलांतर याप्रमाणे अधिक शिक्षित किंवा कमी कुशल लोक नसतात. ३लोकसंख्या ( चे घटक स्थलांतराचा वेग, यांमध्ये निव्वळ मिळकत नसेल तर या दिशेने झालेले स्थलांतर अगदीच कमी निवडीचे असते. एकाच दिशेने जर प्रवाह जास्त असेल तर दोन्ही बाजूने निवडकता जास्त असतेज्या (४ . ठिकाणी अपसरण घटक प्रभावशाली असतो ,दुष्काळ . उपासमार त्या ठिकाणी निवडकता कमीत कमी असते. एका ठिकाणी निवडता ही कमीत कमी असते त्याठिकाणी आकर्षकता जास्त असते त्याठिकाणी निवडता ही देखील दखल घेणे योग्य असते.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

१) असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या मजुरांचे प्रश्न जाणून घेणे.

२) नाशिक जिल्ह्यातील असंघटित क्षेत्रातील स्थलांतरित मजुरांच्या स्थलांतराचा कारणांचा शोध घेणे.

३) मजुरांचे स्थलांतरास कारणीभूत ठरत असलेल्या घटकांचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहीतकृत्ये:**

प्रस्तुत संशोधनासाठी पुढील गृहीतकृत्य होते.

१) असंघटित क्षेत्रातील स्थलांतरित कामगारांना किंवा मजुरांना वाढती मागणी असली तरी त्यांचे आर्थिक व सामाजिक दर्जात फारसा बदल होताना दिसत नाही.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत संशोधनात सर्वेक्षण व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे .सर्वेक्षण पद्धतीचे वैशिष्टे:

१) माहिती प्रश्नावलीच्या आधारे किंवा व्यक्तीच्या मुलाखती होऊन थोड्या वेळात व कमी श्रमात संकलित करता येते.
२) वेगवेगळ्या वयोगटातील व्यक्ती असल्याने वेगवेगळ्या वयोगटाची वर्तमान वैशिष्टे संकलित करता येतात.
३) सर्वेक्षण जनसंख्येच्या वैशिष्ट्यांशी संबंधित असते ,जनप्रवाहाची प्रवृत्ती समजून घेणे . .हा सर्वेक्षणाचा प्रमुख हेतू असतो
४) सर्वेक्षण हे गुणात्मक असतेतसेच . .संख्यात्मकही असते
५) सर्वेक्षणात भाषेला महत्व आहे.
६) वर्तमान स्थिती समजून घेणे.

तसेच हे संशोधन प्राथमिक आणि दुय्यम सांख्यिकी व तथ्यांवर आधारित आहे. संशोधनाचे उद्दिष्टे साध्य करण्यासाठी तथ्ये संकलनासाठी क्षेत्र स्तरावरील प्राथमिक स्त्रोतांबरोबरच द्वितीयक स्त्रोतांचा आधार घेतला आहे. प्रस्तुत संशोधन प्राथमिक आणि द्वितीयक स्त्रोतांवर आधारित असल्याने द्वितीयक स्त्रोतांच्या आधारासाठी प्राथमिक तथ्ये संकलन आवश्यक आहे. त्यासाठी संशोधनात क्षेत्र स्तरावरील तत्थे व सांख्यिकी प्रश्नावली, मुलाखती द्वारे संकलित केली.

**तथ्य संकलन पद्धती :**

प्रस्तुत संशोधनात सर्वेक्षण व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे .कोणत्याही संशोधनाच्या परीकल्पानांची पडताळणी करण्यासाठी व संशोधनाची उद्दिष्ट साध्य करण्यासाठी संशोधनात क्षेत्रातील तथ्य संकलन आवश्यक असते. प्रस्तुत संशोधनात प्राथमिक आणि द्वितीयक तथ्य संकलन खालील प्रमाणे केले आहे.

**प्राथमिक तथ्य संकलन:**

संशोधन कार्यात जेव्हा संशोधक स्वतः संशोधन क्षेत्रात जावून प्रत्यक्ष तथ्य संकलन करतात त्यास 'प्राथमिक तथ्य संकलन' असे म्हणतात. प्रस्तुत संशोधन प्राथमिक आणि द्वितीयक स्त्रोतांवर आधारित असल्याने द्वितीयक स्त्रोतांच्या आधारासाठी प्राथमिक तथ्ये संकलन आवश्यक आहे. त्यासाठी संशोधनात संशोधनक्षेत्र स्तरावरील तत्थे व सांख्यिकी प्रश्नावली, मुलाखती द्वारे संकलित केली. तसेच संशोधन काळातील निरीक्षणांच्या नोंदी ठेऊन त्याचा संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी उपयोग केला आहे.

प्राथमिक स्त्रोतांमध्ये स्थलांतरित कामगारांसाठी मुलाखत अनुसूची भरून घेतली आहे. नाशिक जिल्ह्यातील आदिवासीबहुल विभागातील दोन तालुक्यातील एकूण ६० स्थलांतरित मजुरांकडून मुलाखत अनुसूची भरून घेतली असून या अनुसूचीच्या माध्यमातून मिळालेल्या तथ्यांच्या साहाय्याने योग्य निष्कर्ष काढले आहे.

**द्वितीयक तथ्य संकलन:**

विविध संदर्भ पुस्तके, शासकीय अहवाल, माहिती पुस्तिका, वर्तमान पत्रे, उद्योग मंत्रालयाचे वार्षिक अहवाल, विविध कामगार कल्याण

संस्थांनी केलेले संशोधन, विविध शासकीय संस्थांचे अहवाल, जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन याच बरोबर वर्तमानपत्रे, संकेतस्थळे या स्त्रोतांचा द्वितीयक सामुग्री म्हणून संशोधन कार्यासाठी उपयोग केला आहे.

**सैद्धांतिक चौकट:**

प्रस्तुत संशोधनासाठी पुढील सिद्धांताचा आधार घेण्यात आला.

**स्थलांतराच्या सर्व सामान्य तत्वावरील सिद्धांत:**

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात इ. जी. रवेन्स्तेन यांनी २० देशांच्या माहिती संकलनावर आधारित अनेक प्रकारच्या सिद्धांतांचा दावा केला. इ. जी. रवेन्स्तेन यांनी स्थलांतर संदर्भात दोन लेख 'स्थलांतराचा सिद्धांत' जून १९८५ व जून १९८९ या कालावधीत The Journal of Royal Statistical Society' या नियतकालिकामध्ये प्रसिद्ध केले आहेत. हे दोन्ही लेख अनुभव आणि सैद्धांतिक पातळीवर आधारित असल्याने आज सुद्धा स्थलांतराच्या मांडल्या जाणाऱ्या सिद्धांतांमध्ये प्रचलित आहेत.

एवेरेट्ट ली यांनी स्थलांतरासाठी जे घटक कारणीभूत आहेत ते घटक पुढील प्रमाणे मांडले आहेत.

१) उत्पत्ती स्थानाशी संबंधित असणारे घटक

उदा. जास्त वेतन, व नोकरीच्या अधिक संधी

२) मुक्कामाच्या स्थानाशी संबंधित असणारे घटक

उदा. धोका व अनिश्चितता

३) उत्पत्ती स्थान व मुक्काम या मध्ये असणारे अडथळे

उदा. अंतर, किंमत प्रतिबंधात्मक नियम

४) वैयक्तिक घटक

उदा. वय, लिंग, वर्ग शिक्षण कौशल्य

**निष्कर्ष:**

1) स्थानिक क्षेत्रामध्ये वर्षभर रोजगाराची उपलब्धता नसल्याने उदरनिर्वाहासाठी स्थलांतर करावे लागते.
2) स्थलांतरीत कामगारांना मिळणाऱ्या कामाचे व वेतनाचे स्वरूप निश्चित नसते.
3) स्थलांतरीत कामगारांना साप्ताहिक सुट्ट्या , चा लाभ .आजारपणातील सुट्ट्या इ ,बोनस .होत नाही
4) स्थलांतरीत कामगारांना नवीन कामाची त्वरित उपलब्धता होत नाही.
5) स्थलांतरीत कामगारांना कामाच्या ठिकाणी स्थानिक कामगारांसारखी वागणूक मिळत नाही.

**संदर्भ सुची:**


1. Breman Jan (1994), "Wage hunters and Cathers search for work in Urban and Rural Economy of South India", Oxford University Press, New Delhi.
2. Salve Dr. W .N. (2009) "Reports on Labor and Labor standards for migrant labor in India".2010
3. Bhatt Ila (2001) "The Unorganized sector, Work Security and Social

Protection", SAGE Publication, Edition-9, New Delhi.

**मराठी संदर्भ:**

१. शिरसाठ डॉ. सतीश, (२०१०), " असंघटीत कामगार", प्रकाशक :- डॉ. माणिक जाधव , पुणे विद्यापीठ पुणे,द्वितीयावृत्ती - २०१०
२. झा.श्रीरंग (२०१२), अपीजय स्कूल ऑफ मनेजमेंट, " भारतातील श्रम सुधारणा संधी व आव्हाने", योजना मासिक, एप्रिल,२०१२
३. झा. प्रवीण, (२०१७), Center for Economic studies and Planning," भारतातील कामगारांचे परिदृश्य; काही संवेदनशील मुद्दे", योजना मासिक, एप्रिल, २०१७